## एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड

**सीआयएनः L45200MH2002PLC136779**
रजिस्टर्ड ऑफीस: ए . 412, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०७२
इ.मेल: **investorrelations@mepinfra.com** वेबसाईट: **www.mepinfra.com**
टेलिफोन : ९१ २२ ६१२० ४८०० फॅक्स: ९१ २२ ६१२० ४८०४

### सूचना

### १४वी वार्षिक सर्वसाधारण सभा, सभासद नोंदवहीची परिसमाप्ती / सभासद नोंदवहीचे क्लोजर आणि रिमोट ई–मतदानाची माहिती

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, २८ जून, २०१६ तारखेच्या नोटिसमध्ये नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी एमईपी इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, ४ ऑगस्ट, २०१६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, हॉल ऑफ कल्चर, नेहरु सेंटर, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई – ४०० ०१८ येथे घेण्यात येईल. आम्ही प्रत्येक सभासदाला कुरिअरद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सभेची सूचना आणि कंपनीचा वार्षिक अहवाल पाठवण्याचे काम पूर्ण केले आहे. हे दस्तऐवज येथे देखील उपलब्ध आहेत: https://www.mepinfra.com

**बुक क्लोजर व लाभांश प्रदान करणे**

कंपनी ॲक्ट २०१३ च्या कलम ९१ न्वये देखील सूचित करण्यात येत आहे की, १४ व्या एजीएमसाठी व ३१ मार्च, २०१६ ला संपलेल्या वर्षासाठी लाभांश मिळवण्यास पात्र सभासद निश्चित करण्यासाठी, सभासद नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण पुस्तिका शनिवार, ३० जुलै, २०१६ ते गुरुवार, ४ ऑगस्ट, २०१६ (दोन्ही दिवस समाविष्ट) ह्या दरम्यान बंद राहतील.

गुरुवार, ४ ऑगस्ट, २०१६ ला ज्या सभासदांची नावे कंपनीच्या सभासदांच्या नोंदवहीत दिसून येतील आणि / किंवा शुक्रवार, २९ जुलै, २०१६ च्या समाप्तीला डिपॉझिटरीजद्वारा सांभाळण्यात येणाऱ्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत दिसून येतील, अशा सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित करण्यात आल्यानंतर प्रत्येकी १०/– रूपयाच्या समभागावर ०.१० रूपये ह्या दराने लाभांश प्रदान करण्यात येईल. वरील प्रमाणे लाभांश प्रदान करण्याच्या हेतूसाठी केवळ शुक्रवार, २९ जुलै, २०१६ च्या समाप्तीपर्यंत प्राप्त होणारे हस्तांतरण दस्तऐवज विचारात घेण्यात येतील.

**इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदान**

कंपनी ॲक्ट २०१३ च्या कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) दुरुस्ती नियम, २०१५ न्वये बदल करण्यात आलेल्या कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या कलम २० नुसार तसेच सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट) नियम, २०१५ च्या नियम ४४ नुसार, सभेमध्ये पार पाडावयाचे कामकाज हे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पार पाडण्यात येऊ शकते. ठरावांवर आपल्या मतदानाचा अधिकार बजावता यावा यासाठी नॅशनल सिक्युरिटीझ डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे घेण्यात आलेल्या ई–मतदान व्यासपीठाच्या माध्यमातून आपल्या सभासदांना ई–मतदान सुविधा (रिमोट ई–मतदान)प्रदान करताना कंपनीला आनंद होत आहे. गुरुवार, २८ जुलै, २०१६ रोजी सदस्य किंवा लाभधारक मालक म्हणून ज्यांची नावे रजिस्टरमध्ये नोंद झालेली आहेत असे सभासद रिमोट ई–मतदान सुविधेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. ८ जुलै, २०१६ ह्या तारखेला एकतर वास्तविक स्वरुपात किंवा डिमटेरिअलाईज्ड स्वरुपात भागधारण केलेल्या कंपनीच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यासाठी युजर आयडी आणि पासवर्ड देण्यात आला आहे. सदर तारखेनंतर समभाग खरेदी केलेल्या पात्र सभासदांनी युजर आयडी व पासवर्ड मिळवण्यासाठी एनएसडीएलला evoting@nsdl.co.in वर किंवा आमच्या रजिस्ट्रारशी / निबंधकांशी rnt.helpdesk@linkintime.co.in वर संपर्क साधावा. जे सदस्य ई–मतदानासाठी आधीपासूनच एनएसडीएलचे नोंदणीकृत सदस्य आहेत, ते सदस्य ई–मतदानातून मत देण्याकरिता / नोंदवण्याकरिता आपला सद्य युजर आयडी आणि पासवर्डचा वापर करु शकतात. २८ जून, २०१६ तारखेच्या एजीएम नोटिसमध्ये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्याची विनंती सभासदांना करण्यात येत आहे. सदर नोटिस कंपनीच्या https://www.mepinfra.com ह्या वेबसाईटवरुन किंवा एनएसडीएलच्या वेबसाईटवरुनही डाऊनलोड करता येऊ शकेल.

ई–मतदान कालावधी सोमवार, १ ऑगस्ट, २०१६ रोजी सकाळी ९:०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) सुरु होईल आणि बुधवार, ३ ऑगस्ट, २०१६ ला सायंकाळी ५:०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) समाप्त होईल. सदर तारीख आणि वेळेनंतर सभासदांना ई–मतदान करता येणार नाही. भागधारकाने एखाद्या ठरावावर मत दिल्यानंतर त्याला मत बदलण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

ज्यांनी रिमोट ई–मतदान पद्धतीने मतदान केले आहे असे सभासद एजीएमला उपस्थित राहू शकतील, परंतु पुन्हा मतदान करण्यास पात्र नसतील. ज्यांनी रिमोट ई–मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे सभासद एजीएममध्ये मतदान करु शकतील. एजीएममध्ये मतदान पत्रिकेद्वारे मतदान सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**पत्त्यामधील बदल / लाभांश अधिपत्र**

वास्तविक स्वरुपात भागधारणा केलेल्या सभासदांना, पत्त्यामध्ये कोणताही बदल होण्याच्या बाबतीत / लाभांश अधिपत्राच्या बाबतीत कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण एजण्ट–लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी–१३, पन्नालाल सिल्क मिल्स कंपांउंड, एल.बी.एस. मार्ग, भांडूप (प.), मुंबई– ४०० ०७८ येथे उशिरात उशिरा म्हणजे शुक्रवार, २९ जुलै, २०१६ पर्यंत माहिती कळविण्याची विनंती करण्यात येत आहे. डिमॅट स्वरुपात भागधारणा केलेल्या सभासदांनी अशा बदलांबाबत त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपण्ट्सना (डीपी) वेळेवर माहिती कळवावी.

**परिनिरिक्षक**

कंपनीने सीएस दिनेश जोशी, प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव (सदस्यत्व क्र. FCS ३७५२ सीपी क्र. २२४६) यांना परिनिरिक्षक म्हणून नियुक्त केले आहे. ते मतदान आणि रिमोट ई–मतदान प्रक्रिया योग्य आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी परिनिरिक्षकाची भूमिका निभावतील.

**प्रॉक्सी**

एजीएमला उपस्थित राहाण्यास आणि मतदान करण्यास पात्र सभासद स्वतःऐवजी एजीएमला उपस्थित राहण्यासाठी आणि मतदान करण्यासाठी प्रॉक्सीची नेमणूक करण्यास पात्र असतील आणि प्रॉक्सी कंपनीचा सभासद असण्याची आवश्यकता नाही. प्रॉक्सी नियुक्तीचे वैध इन्स्ट्रूमेण्ट कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात मीटिंग आरंभ होण्याच्या ४८ तास आधी म्हणजेच मंगळवार, २ ऑगस्ट, २०१६ रोजी सकाळी ११:३० वाजण्यापूर्वी सादर करावे.

**संपर्क तपशीलः**

रिमोट ई–मतदानासंबंधी काही तक्रारी असल्यास, सदस्याला https://www.evoting.nsdl.com ह्या वेबसाईटच्या डाऊनलोड्स भागामध्ये उपलब्ध असणारे, भागधारकांसाठीचे, वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि ई–मतदान युझर मॅन्युअल–भागधारक या दस्तऐवजांचा संदर्भ घेता येईल किंवा १८००–२२२–९९० या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधता येईल. याखेरिज सदस्याला आपली तक्रार कंपनी सचिवांकडे येथे दाखल करता येईलः investorrelations@mepinfra.com

**एमईपी इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स लिमिटेडसाठी**
**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**श्रीधर फडके**
**कंपनी सेक्रेटरी**

ठिकाणः मुंबई
दिनांकः जुलै १२, २०१६